# प्रकरण II

# लेखापरीक्षा चौकट

# प्रकरण II

# लेखापरीक्षा चौकट

## 2.1 लेखापरीक्षणाची उद्दीष्टे

खालील मुद्द्यांचे निर्धारण करण्यासाठी हे संपादणूक लेखापरीक्षण केले होते:

- चौऱ्याहत्तरावी संविधान सुधारणा अधिनियम, 1992 च्या तरतुदी राज्यांच्या विधिविधानांमध्ये समुचित रीतीने समाविष्ट केल्या होत्या किंवा कसे;
- योग्यरीत्या निर्माण केलेल्या संस्था/संस्थात्मक कार्यतंत्र यांच्याद्वारे राज्य शासनाने नागरी स्थानिक संस्थांना त्यांची कार्ये प्रभावीपणे पार पाडण्यासाठी शक्ती प्रदान केल्या आहेत किंवा कसे;
- नागरी स्थानिक संस्थांकडे त्यांच्या कार्यांशी सुसंगत आर्थिक संसाधने उभारण्यासाठी संधी आणि अधिकार आहेत किंवा कसे आणि नागरी स्थानिक संस्थांना केंद्र आणि राज्य शासनाकडून परिकल्पित निधी प्राप्त होतो किंवा कसे;
- नागरी स्थानिक संस्थांकडे त्यांच्या कार्यांशी सुसंगत मानवी संसाधने एकत्रित करण्याचे आणि प्रोत्साहन देण्याचे अधिकार आहेत किंवा कसे; आणि
- नागरी स्थानिक संस्था नागरिकांना प्रभावीपणे सेवा देत आहेत किंवा कसे.

## 2.2 लेखापरीक्षणाचे निकष

लेखापरीक्षेचे निकष खालीलप्रमाणे होते:

- संविधान (चौऱ्याहत्तरावी) सुधारणा अधिनियम, 1992;
- मुंबई महानगरपालिका अधिनियम, 1888;
- महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम, 1949;
- महाराष्ट्र नगर परिषदा, नगर पंचायती आणि औद्योगिक वसाहती अधिनियम, 1965;
- केंद्रीय/राज्य वित्त आयोगाचे अहवाल; आणि
- भारत सरकारच्या गृहनिर्माण आणि शहरी व्यवहार मंत्रालयाने जारी केलेल्या सेवा स्तर निकषांची निर्देश पुस्तिका.

## 2.3 लेखापरीक्षणाची व्याप्ती आणि कार्यपद्धती

डिसेंबर 2020 ते मार्च 2021, ऑगस्ट 2021 आणि एप्रिल 2022 ते मे 2022 या कालावधीत 2015-16 ते 2020-21 या कालावधीचे महाराष्ट्र शासनाच्या नगरविकास

विभाग आणि वित्त विभाग तसेच नगरपरिषद प्रशासन संचालनालय, मुंबई यांच्या अभिलेख्यांची चाचणी-तपासणी करण्यात आली. याशिवाय, नागरी स्थानिक संस्थांच्या प्रत्येक स्तरातून यादृच्छिक नमूना पद्धतीने निवडलेल्या 43 नागरी स्थानिक संस्थांचे अभिलेख आणि नागरी स्थानिक संस्थांच्या पाणीपुरवठा, स्वच्छता, अग्निशमन सेवा या तीन कार्यांची चाचणी-तपासणी करण्यात आली. निवडलेल्या नागरी स्थानिक संस्थांची यादी **तक्ता 2.1** मध्ये दर्शविली आहे.

**तक्ता 2.1: निवडलेल्या नागरी स्थानिक संस्थांची यादी**

| अ.क्र. | नागरी स्थानिक संस्थांचे प्रकार | लोकसंख्यानिहाय वर्गवारी | घटकांची एकूण संख्या | निवडलेले घटक | घटकांची नावे |
|---|---|---|---|---|---|
| 1 | महानगरपालिका | तीन लाखांच्या वर | 27 | 07 | अमरावती, लातूर, नागपूर, नाशिक, पिंपरी-चिंचवड, ठाणे, वसई-विरार |
| 2 | नगरपरिषदा | 25 हजारांच्या वर आणि तीन लाखांपेक्षा कमी | 241 | 24 | अलिबाग, बार्शी, चोपडा, धामणगाव, हिंगणघाट, इचलकरंजी, जालना, काटोल, खामगाव, खोपोली, खुलताबाद, कुळगाव-बदलापूर, महाबळेश्वर, मलकापूर, नंदुरबार, नांदुरा, निलंगा, उस्मानाबाद, रामटेक, सिल्लोड, सिन्नर, तळेगाव-दाभाडे, त्र्यंबक, यवतमाळ |
| 3 | नगर पंचायती | 10 हजारांच्या वर आणि 25 हजारांपेक्षा कमी | 128 | 12 | भातकुली, लाखनी, मेढा, मोहाडी, मोटाळा, मुरबाड, रेणापूर, साक्री, सिंदखेड, शिरूर-अनंतपाल, शिराळा, तळा |
| | | **एकूण** | **396** | **43** | |

यादृच्छिक आधारावर निवडलेल्या 43 नागरी स्थानिक संस्थांव्यतिरिक्त, बृहन्मुंबई महानगरपालिका, जी राज्यातील दाट लोकसंख्या असलेली सर्वात मोठी नागरी स्थानिक संस्था आहे, तिची देखील चाचणी-तपासणी करण्यात आली.

लेखापरीक्षेची उद्दिष्टे, लेखापरीक्षेची व्याप्ती आणि निकष प्रधान सचिव, नगर विकास विभाग, महाराष्ट्र शासन यांना सूचित (जुलै 2021) केले गेले. 1 फेब्रुवारी 2022 रोजी आयोजित निर्गमन बैठकीत प्रधान सचिव, नगर विकास विभाग, महाराष्ट्र शासन यांच्याशी लेखापरीक्षा निष्पत्तीवर चर्चा करण्यात आली आणि अहवाल तयार करताना विभागाचे प्रतिसाद विचारात घेतले गेले.

## 2.4 अभिस्वीकृति

कोवीड-2019 या साथीच्या रोगामुळे उत्पन्न झालेल्या अडचणी असूनही लेखापरीक्षा सुरळीत पार पाडण्यासाठी नगरविकास विभाग, वित्त विभाग, नगरपरिषद प्रशासन संचालनालय आणि सर्व चाचणी-तपासणी केलेल्या नागरी स्थानिक संस्थांनी वेळोवेळी अभिलेखे, माहिती आणि स्पष्टीकरणे प्राप्त होण्यासाठी केलेले सहकार्य आणि सहाय्य याबद्दल लेखापरीक्षा आभारी आहे.

## 2.5 अहवालाची रचना

लेखापरीक्षा निष्पत्ती खालील प्रकरणांमध्ये सादर केल्या आहेत:

प्रकरण 3: संविधान (चौऱ्याहत्तरावी) सुधारणा अधिनियमाच्या तरतुदींचे अनुपालन

प्रकरण 4: नागरी स्थानिक संस्थांचे सक्षमीकरण आणि त्यांची कार्ये

प्रकरण 5: नागरी स्थानिक संस्थांची वित्तीय संसाधने

प्रकरण 6: नागरी स्थानिक संस्थांमधील मानवी संसाधने

प्रकरण 7: पाणीपुरवठा, स्वच्छता आणि अग्निशमन सेवा पुरवण्यातील परिणामकारकता